(१४ पैकी शासन निर्णय क्र.१)
**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत. प्रलंबित खटल्याबाबत पुनर्विलोकन करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
## शासन निर्णय क्रमांकः डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १२ मे, २०१५

**वाचा :**

१. विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.१००/का.१२ दिनांक १७.०८.२०११
२. विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.१००/का.१२ दिनांक २१.११.२०११
३. विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.१००/का.१२ दिनांक २६/१२/२०१२

**प्रस्तावना :**

पोलीस ठाण्यामध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते. तपासातील पुराव्याच्या आधारे न्यायालयामध्ये दोषारोपसिध्दीबाबत खटला चालू राहतो. राज्यातील १२९१ न्यायालयांमध्ये अशाप्रकारचे १८ लाखांपेक्षा अधिक गुन्ह्यांमध्ये वर्षानुवर्षे खटले प्रलंबित आहेत. सबळ पुरावा तसेच तांत्रिक व कायदेशिर बाबींतील त्रुटीमुळे दोषारोपसिध्दीचे प्रमाणही कमी आहे. वर्षानुवर्षे खटला सुरु राहिल्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांना नाहक त्रास सहन करावा लागतो . याबाबत विश्लेषण केल्यानंतर शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, आरोपीचा बचाव करण्याचा आरोप किंवा टीका होऊ नये याकारणाकरिता सबळ पुरावा नसतानाही तपासी अधिकारी ब-याच प्रकरणांमध्ये दोषारोपत्र दाखल करतात तसेच, काही प्रकरणांमध्ये तपास पूर्ण झालेला नसतानाही तपासी अधिकारी अर्धवट दोषारोपपत्र दाखल करतात. यासर्व बाबींमुळे दोषारोपसिध्दीचे प्रमाण घटत आहे. मा.सर्वोच्च न्यायालय /मा.उच्च न्यायालय यांनी कोणते पुरावे ग्राह्य नाहीत याबाबत वेळोवेळी निदेश दिल्यामुळे सध्या प्रलंबित दोषारोप पत्रांचे पुनर्विलोकन होणे गरजेचे आहे. संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विधि व न्याय विभागाने राज्यातील फौजदारी व दिवाणी स्वरुपाचे प्रकरणांपैकी जुनी व निरर्थक प्रकरणे काढून टाकण्याबाबतच्या

मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. सदरची प्रलंबित जुनी व निरर्थक प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्याकरिता राज्यस्तरीय समिती व जिल्हा स्तरीय समिती स्थापन केली आहे. सबब राज्यातील प्रलंबित खटल्यांचे पुर्नविलोकन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील प्रलंबित खटल्यांचे पुनर्विलोकन करुन जुनी व निरर्थक प्रकरणे काढून टाकण्याकरिता विधी व न्याय विभागाच्या संदर्भाधीन क्र.३ मधील शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश | - अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी | - सदस्य |
| ३. | पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक | - सदस्य |
| ४. | सहाय्यक संचालक आणि सरकारी अभियोक्ता | - सदस्य |
| ५. | जिल्हा सरकारी वकिल | - सदस्य सचिव |

**२.** संदर्भाधीन विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार जुने व निरर्थक खटले काढण्याबद्दल समिती राज्य शासनास शिफारस सध्या करीत आहे. त्याच धर्तीवर उपरोक्त परिच्छेद क्र.१ नमूद केलेली समिती सर्व प्रलंबित खटल्यांचे पुनर्विलोकन करुन सदर प्रलंबित खटले खालील ४ भागांमध्ये विभाजित करुन घेईल.

(अ) सीआरपीसी कलम २५८ प्रमाणे ज्या समन्स प्रकरणांमध्ये निकाल न लावता न्यायिक प्रक्रिया थांबविण्याची गरज आहे, असे खटले

(आ) ज्या खटल्यांमध्ये पुरावा नसल्यामुळे किंवा मा. सर्वोच्च न्यायालयाने किंवा मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार खटल्यांमध्ये असलेला पुरावा हा शाबीत होत नाही, असे खटले

(इ) ज्या खटल्यांच्या तपासामध्ये त्रुटी असल्यामुळे किंवा कागदपत्रे नसल्यामुळे गुन्हा शाबीत होऊ शकत नाही असे खटले.

(ई) ज्या खटल्यामध्ये गुन्हा शाबीत होऊ शकतो असे खटले

**३.** संबंधित सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी वर्गवारी (अ) "सीआरपीसी कलम २५८ प्रमाणे ज्या समन्स प्रकरणांमध्ये निकाल न लावता न्यायिक प्रक्रिया थांबविण्याची गरज आहे, असे खटले" मध्ये सीआरपीसी कलम २५८ प्रमाणे पुढील कारवाई करेल.

**४.** सदर समितीने दिलेल्या शिफारशीनुसार गृह विभाग, विधि व न्याय विभागाचा सल्ला घेऊन, वर्गवारी (आ) "ज्या खटल्यांमध्ये पुरावा नसल्यामुळे किंवा मा. सर्वोच्च न्यायालयाने किंवा मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार खटल्यांमध्ये असलेला पुरावा हा शाबीत होत नाही, असे खटले" ची प्रकरणे सीआरपीसी ३२१ प्रमाणे मागे घेतील

५. सदर समितीने दिलेल्या शिफारशीनुसार गृह विभाग, विधि व न्याय विभागाचा सल्ला घेऊन, वर्गवारी (इ) "ज्या खटल्यांच्या तपासामध्ये त्रुटी असल्यामुळे किंवा कागदपत्रे नसल्यामुळे गुन्हा शाबीत होऊ शकत नाही असे खटले." ची प्रकरणे सीआरपीसी १७३ (८) प्रमाणे संबंधित तपासी यंत्रणेला पुढील तपासासाठी परत घेण्याची शिफारस करतील.

६. सदर समितीने दिलेल्या शिफारशीनुसार "वर्गवारी (ई) ज्या खटल्यामध्ये गुन्हा शाबीत होऊ शकतो असे खटले" मध्ये संबंधित सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अपराधसिद्धीकरिता न्यायालयामध्ये पाठपुरावा करावा.

७. उपरोक्त परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केलेल्या समितीला मदत करण्यासाठी आणि प्रलंबित खटल्यांची माहिती करून देण्यासाठी तालुका स्तरावर खालीलप्रमाणे एक छाननी समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १.तालुक्यामधील वरिष्ठ प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी | -अध्यक्ष |
| २.प्रत्येक जिल्ह्यातील सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय | -सदस्य |
| ३.उप विभागीय पोलीस अधिकारी | -सदस्य |
| ४.वरिष्ठ सहाय्यक सरकारी अभियोक्ता | -सदस्य |

८. उपरोक्त परिच्छेद क्र.(१) व परिच्छेद क्र.(७) मध्ये नमूद केलेली समिती महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये बैठक घेईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१२१७१३५७९२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.12 18:27:43 +05'30'

**(द.सं.पाटील)**

उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
१९. उप सचिव (वि.शा.-२)
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती

**(१४ पैकी शासन निर्णय क्र.२)**
**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**
**सर्व शासकीय अभियोक्ते संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या नियंत्रणाखाली आणणेबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १२ मे, २०१५

**प्रस्तावना :**

न्यायालयात फौजदारी स्वरुपाचा गुन्ह्याबाबत दाखल दोषारोपपत्रावर खटला चालविण्याकरिता शासनाकडून सरकारी अभियोक्ता/ अतिरिक्त सरकारी अभियोक्ता/ विशेष सरकारी अभियोक्ता नियुक्त केले जातात. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये सन २००६ साली संशोधन / सुधारणा करुन त्यामध्ये कलम २५ (ए) जोडण्यात आलेले आहे. सदर कलम २५ (ए) च्या पोटकलम (५) अन्वये, मा. उच्च न्यायालयामध्ये कलम २४ (१) खाली नियुक्त केलेले सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा २४ (८) खाली नियुक्त केलेले विशेष सरकारी अभियोक्ता हे संचालक, अभियोग संचालनालय यांच्या अधिनस्थ राहतील. तसेच कलम २५ (ए) चे पोटकलम (६) अन्वये सत्र न्यायालयामध्ये कलम २४ (३) अन्वये नियुक्त केलेले सरकारी अभियोक्ता अतिरिक्त सरकारी अभियोक्ता व कलम २४ (८) अन्वये नियुक्त केलेले विशेष सरकारी अभियोक्ता हे उप संचालकांच्या अधिनस्थ राहतील अशी तरतूद आहे. प्रत्येक उप संचालक हे संचालक, अभियोग संचालनालय यांच्या अधिनस्त राहतील आणि संचालक, अभियोग संचालनालय हे गृह विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहतील. राज्यामध्ये सदर कायद्याची अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नसल्यामुळे कलम २४ अन्वये सर्व सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता व विशेष सरकारी अभियोक्ता हे सध्या विधि व न्याय विभागाच्या अधिनस्थ आहेत. सदर बाब कायद्याशी सुसंगत नसून दोषारोपसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व अभियोक्ते एकाच नियंत्रणाखाली ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये सन २००६ साली झालेल्या संशोधन / सुधारणाच्या अनुषंगाने, फौजदारी स्वरुपाचा गुन्ह्याबाबत शासनाकडून नियुक्त करण्यात येत असलेल्या सरकारी अभियोक्ता/ अतिरिक्त

सरकारी अभियोक्ता/ विशेष सरकारी अभियोक्ता एकाच नियंत्रणाखाली आणण्याकरिता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

(अ) राज्यातील मा. उच्च न्यायालयात व त्यांच्या खंडपीठांमध्ये नेमलेले सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता , विशेष सरकारी अभियोक्ता हे संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्थ राहतील.

(आ) प्रत्येक जिल्ह्यामध्ये नियुक्त केलेले सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे उप संचालक, अभियोग संचालनालय यांच्या अधिनस्थ राहतील.

**२.** उपरोक्त शासन निर्णयानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी तातडीने करावी.

**३.** महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम-१९८४ Maharashtra Law Officers (Appointment, Condition of Service and Remuneration), Rules, १९८४ व शासकीय विधिविषयक कामकाजाचे नियम, १९८४ (Rules for the conduct of Legal Affairs of Government,१९८४) यामध्ये आवश्यक त्या सुधारणा विधि व न्याय विभागाने तातडीने कराव्यात.

**४.** महाराष्ट्र शासन कार्यनियमावली, २६ जून १९७५ च्या पहिल्या अनुसूचीनुसार विभागांमध्ये करण्यात आलेल्या विषयांच्या वर्गीकरणात आवश्यक त्या सुधारणा सामान्य प्रशासन विभागाने तातडीने कराव्यात.

**५.** सदर शासन निर्णय विधि व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र २१०६ दि.२९/०४/२०१५ नुसार प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१२१७१४३१३५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.12 19:22:39 +05'30'

**(द.सं.पाटील)**
उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

५. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई

६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

७. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

८. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई

१०. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई

११. सर्व पोलीस आयुक्त

१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र

१३. सर्व अपर पोलीस महासंचालक

१४. सर्व जिल्हाधिकारी

१५. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश

१६. सर्व पोलीस अधीक्षक

१७. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव

१९. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव

२०. उप सचिव (पोल-१०)

२१. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२२. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२३. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.३)
**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत. वरिष्ठ पोलीस अधिका-यांना महत्वाच्या खटल्यामध्ये खाजगी वकील नेमण्याचा अधिकार प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १२ मे,२०१५

**प्रस्तावना :**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने काही संवेदनशील व महत्वाच्या खटल्यामध्ये सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शासकीय अभियोक्त्यांची आवश्यकता असते.अशा प्रकारच्या नियुक्तीकरिता शासनाची मान्यता आवश्यक असल्याने कालापव्यय होवून दोषारोपसिद्धीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सबब, दोषारोपसिद्धीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अशा महत्वाच्या खटल्यात विशेष सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार क्षेत्रिय पातळीवर देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने काही संवेदनशील व महत्वाच्या खटल्यामध्ये सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

(अ) पोलीस आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या दरावर वकीलांचे पॅनेल तयार करावेत.

(आ) फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ च्या कलम २४ (८) प्रमाणे, संवेदनशील व महत्वाचे खटले चालविण्यासाठी सदर पॅनेलमधून वकीलांना विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांनी त्यांचे कार्यक्षेत्राकरीता नियुक्त करावे.

२. विशेष सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती करताना खटला सार्वजनिक हिताच्या दृष्टीने संवेदनशील व महत्वाचा असल्याची खातरजमा संबधीत प्राधिका-याने करावी व अशा प्रकरणामध्ये दोषारोपसिद्धी होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

३. सदर नियुक्त करण्यात येणा-या विशेष सरकारी अभियोक्त्यांची व्यावसायिक फी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार अदा करण्याची कार्यपध्दत पुर्वीप्रमाणेच राहील.

४. महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम-१९८४ Maharashtra Law Officers (Appointment, Condition of Service and Remuneration), Rules, १९८४

व शासकीय विधिविषयक कामकाजाचे नियम, १९८४ (Rules for the conduct of Legal Affairs of Government, १९८४) यामध्ये आवश्यक त्या सुधारणा विधि व न्याय विभागाने तातडीने कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१२१७१४२०८५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.12 19:11:42 +05'30'

**(द.सं.पाटील)**
उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई

५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई

९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई

१०. सर्व पोलीस आयुक्त

११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र

१२. सर्व अपर पोलीस महासंचालक

१३. सर्व जिल्हाधिकारी

१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश

१५. सर्व पोलीस अधीक्षक

१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव

१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव

१९. उप सचिव (पोल-१०)

२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२२. निवडनस्ती

**(१४ पैकी शासन निर्णय क्र.४)**
**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत. विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांच्या निवडीकरिता समिती गठीत करणे व विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांच्या सेवेचे नियम करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १२ मे, २०१५

<u>प्रस्तावना :</u>

नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची संख्या कमी असल्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहिता.१९७३ च्या कलम २५ (३) प्रमाणे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीमार्फत करण्यात येते. सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता आणि पोलीस अधीक्षक यांचा समावेश आहे.सध्या अशा विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या सेवेबाबतचे कोणतेही नियम तयार करण्यात आलेले नाहीत. सबब, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या निवड प्रक्रियेला जास्त परिणामकारक करण्यासाठी निवड समितीमध्ये संचालक किंवा उप संचालक, अभियोग संचालनालय यांचा समावेश करणे व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता त्यांच्यावर प्रशासकीय स्वरुपाचे नियंत्रण ठेवणे व त्यांच्यावर जबाबदारी ठरविणेकरिता त्यांचे सेवेचे नियम करण्याच्या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

**शासन निर्णय:**

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या निवड प्रक्रियेला जास्त परिणामकारक करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ च्या कलम २५(३) प्रमाणे विशेष सहाय्यक सरकारी

अभियोक्त्यांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत समिती गठीत करण्याचा शासन निर्णय घेत आहे

| | |
|---|---|
| (अ) जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| (ब) संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी म्हणून उप संचालक, अभियोग संचालनालय | - सदस्य |
| (क) पोलीस आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी | - सदस्य |
| (ड) पोलीस अधीक्षक | - सदस्य |

२. उपरोक्त परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केलेल्या समितीने फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ च्या कलम २५(३) प्रमाणे आवश्यकतेनुसार विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ च्या कलम २५(३) अंतर्गत निवड झालेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेवर प्रशासकीय स्वरुपाचे नियंत्रण ठेवणे व त्यांच्यावर जबाबदारी ठरविणेकरिता त्यांचे सेवेचे नियम करण्याकरिता गृह विभागाकडे अधिकार देण्यात येत आहेत.त्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| (अ) संचालक, अभियोग संचालनालय | - अध्यक्ष |
| (ब) सह सचिव/उप सचिव (विधी व न्याय विभाग) | - सदस्य |
| (क) उप संचालक, अभियोग संचालनालय | - सदस्य सचिव |

४. उपरोक्त परिच्छेद क्र. (२) मध्ये नमूद केलेल्या समितीने विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या सेवेचे नियम तयार करून गृह विभागाच्या मान्यतेस्तव सादर करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१२१७१४४१४३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.12 19:39:44 +05'30'

**(द.सं.पाटील)**
उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई

५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई

९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई

१०. सर्व पोलीस आयुक्त

११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र

१२. सर्व अपर पोलीस महासंचालक

१३. सर्व जिल्हाधिकारी

१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश

१५. सर्व पोलीस अधीक्षक

१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव

१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव

१९. उप सचिव (पोल-१०)

२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

२२. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.५)
**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**
**शासकीय अभियोक्त्यांना नियतकालिक प्रशिक्षण देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १२ मे, २०१५

**वाचा :**

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३/९/२०११

**प्रस्तावना :**

पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते. तपासातील पुराव्याच्या आधारे न्यायालयामध्ये दोषारोपसिध्दीबाबत खटला चालू राहतो. न्यायालयात दोषारोप सिध्द होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय अभियोक्त्यांनी कायद्यातील बदलासोबत अद्यावत राहणे गरजेचे आहे.संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित केले असून, त्याअनुषंगाने सर्व शासकीय अभियोक्त्यांना नियतकालीक प्रशिक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील सर्व शासकीय अभियोक्त्यांना “राज्य प्रशिक्षण धोरण” च्या अनुषंगाने नियतकालीक प्रशिक्षण देण्याचा निर्णय शासन घेत आहे.

२. संचालक, अभियोग संचालनालय यांनी राज्यातील सर्व सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व विशेष सरकारी अभियोक्ता यांना द्यावयाच्या आवश्यक उजळणी अभ्यासक्रम (Refresher Course) तज्ञामार्फत तयार करून घ्यावा.

३. उजळणी अभ्यासक्रमात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने दिलेले निकाल, नवीन नियमाची माहिती व नुकत्याच झालेल्या निकालाबद्दल माहिती देणे इत्यादी बाबी अंतर्भुत कराव्यात तसेच,उजळणी अभ्यासक्रमामध्ये कालानुरुप आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

४. शासकीय अभियोक्ते यांचा सेवा कालावधी व कामाचे स्वरुप विचारात घेऊन टप्प्या टप्प्याने प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करावा.

५. प्रशिक्षणाकरिता शासकिय अभियोक्ता यांची संख्या निश्चित करताना उपलब्ध अधिका-यांची संख्या विचारात घ्यावी जेणेकरुन खटल्यांच्या सुनावणीवर परिणाम होणार नाही.

६. सर्व शासकिय अभियोक्त्यांना वर्षातून किमान एक आठवडा उजळणी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण मिळेल याची दक्षता घ्यावी.

७. यशदा,पुणे या राज्याच्या “शिखर प्रशिक्षण संस्था” शी सल्लामसलत करुन शासकिय अभियोक्ता प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे, प्रशिक्षणाचे नियोजन करणे व अंमलबजावणी करणे याबाबतची कार्यवाही करावी.

८. प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता प्रशिक्षणाचा सुनिश्चित आराखडा तयार करुन संचालक, अभियोग संचालनालय यांनी प्रशासकिय विभागाच्या मान्यतेने आर्थिक तरतूद करून घ्यावी. जेणेकरुन संबधित आर्थिक वर्षात प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे सुलभ होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१२१७१४५१३७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.12 19:59:03 +05'30'

**(द.सं.पाटील)**

उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

५. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई

६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

७. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

८. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
१०. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
११. सर्व पोलीस आयुक्त
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१३. सर्व अपर पोलीस महासंचालक
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१६. सर्व पोलीस अधीक्षक
१७. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१९. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२०. उप सचिव (पोल-१०)
२१. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.६)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पदोन्नती व सरकारी अभियोक्ता/ अतिरिक्त सरकारी अभियोक्ता/ विशेष सरकारी अभियोक्ता/ विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची पुनर्नियुक्ती दोषारोपसिध्दीच्या प्रमाणाशी संलग्न करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४ अन्वये सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती विधि व न्याय विभागामार्फत दोन किंवा तीन वर्षांसाठी करार पध्दतीवर करण्यात येते. अशा विशिष्ट कालावधीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अभियोक्त्यांच्या पुनर्नियुक्तीच्यावेळी त्यांच्याद्वारे हाताळण्यात आलेल्या कामाचे मूल्यमापन तसेच दोषासिद्धीचे प्रमाण विचारात घेतले जात नाही. त्याचा विपरित परिणाम दोषसिध्दीच्या प्रमाणावर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीअंती सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती गृह विभागाकडून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५ (१) नुसार केली जाते. सदरची नियुक्ती ही नियमित स्वरुपाची असून ते सेवानिवृत्तीपर्यंत कार्यरत असतात. अशा अभियोक्त्यांना पदोन्नती देतेवेळी त्यांनी हाताळलेल्या खटल्यांमधील दोषारोप सिध्दीचे प्रमाण विचारात घेतले जात नाही. सबब, फौजदारी खटल्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पदोन्नती व सर्व सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, विशेष सरकारी अभियोक्ता व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पुनर्नियुक्ती करताना त्यांनी हाताळलेल्या खटल्यामध्ये झालेल्या दोषारोपसिध्दीच्या प्रमाणाशी संलग्न करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

फौजदारी खटल्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५ (१) नुसार नियुक्ती झालेल्या सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पदोन्नती व सर्व सरकारी अभियोक्ता, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, विशेष सरकारी अभियोक्ता व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पुर्ननियुक्ती करताना त्यांनी हाताळलेल्या खटल्यामध्ये झालेल्या दोषारोपसिध्दीच्या प्रमाणाशी संलग्न करण्याचा निर्णय शासन घेत आहे.

२. सर्व सरकारी अभियोक्ता, सर्व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, सर्व विशेष सरकारी अभियोक्ता आणि सर्व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती प्रथम दोन वर्षांसाठी गृह विभागाकडून करार पध्दतीवर करण्यात येईल.

३. दोन वर्षानंतर सरकारी अभियोक्ता/ अतिरिक्त सरकारी अभियोक्ता/ विशेष सरकारी अभियोक्ता/ विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी हाताळलेल्या खटल्यांमध्ये दोषारोपसिध्दीचे प्रमाण हे २५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तरच त्यांना पुनर्नियुक्ती देण्याबद्दल विचार करण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५ (१) नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीअंती नियुक्त करण्यात येणा-या सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना पदोन्नती देताना त्यांनी हाताळलेल्या खटल्यांमधील दोषारोपसिध्दीचे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास त्यांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यात येऊ नये.

५. सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पदोन्नती व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची पुनर्नियुक्ती करताना त्यांनी हाताळलेल्या खटल्यामध्ये झालेल्या दोषारोपसिध्दीचे अभिलेख संचालक, अभियोग संचालनालय हे ठेवतील.

६. दोषारोपसिध्दीचे प्रमाण परिगणना करताना संबधित अभियोक्त्यांनी हाताळलेल्या खटल्यापैकी केवळ प्रत्यक्षात निकाली लागलेल्या खटल्यांची संख्या विचारात घेण्यात यावी.

७. खटल्याचा प्रत्यक्ष निकाल लागतेवेळी जो अभियोक्ता सदरचा खटला हाताळत असेल त्यांच्या नावे सदर खटल्याची परिगणना करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१५०२२७२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:15:46 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त

११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
१९. उप सचिव (पोल-१०)
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.७)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**
**खटल्याच्या सुनावणीमध्ये व्हिडीओ कॉन्फरंसिगचा वापर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

राज्यातील विविध कारागृहात मोठ्या प्रमाणावर असलेल्या न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी (under trial prisoners) यांना दर तारखेला न्यायालयासमोर सुनावणीच्या वेळी हजर करावे लागते . सदर न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी यांना न्यायालयात घेऊन जाणे व परत आणणे यामुळे पोलीस यंत्रणेवर ताण पडतो. तसेच बऱ्याच ठिकाणी पोलीस अधिकारी व वैद्यकीय अधिकारी हे दुर्गम भागात कर्तव्यावर असल्यामुळे अथवा काही पोलीस अधिकारी कायदा व सुव्यवस्थेमध्ये व्यस्त असल्यामुळे न्यायालयात साक्ष देण्यासाठी प्रत्यक्ष हजर राहू शकत नाहीत अथवा वेळेवर उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे खटल्याच्या सुनावणीवर विपरित परिणाम होऊन खटले प्रलंबित राहतात अथवा दोषारोपसिध्दीवर परिणाम होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी यांचा न्यायालयाशी संवाद व पोलीस अधिकारी, वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष खटल्याच्या सुनावणीदरम्यान व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे नोंदविण्यची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील विविध करागृहात असलेल्या न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी (under trial prisoners) यांचा न्यायालयाशी संवाद व पोलीस अधिकारी, वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष खटल्याच्या सुनावणीदरम्यान व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे ग्राहय धरण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील विविध कारागृहात असलेल्या न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी (under trial prisoners) यांना दर तारखेला न्यायालयासमोर सुनावणीच्या वेळी हजर न करता संबधित पोलीस/कारागृहअधिकारी यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे न्यायालयाशी सदरच्या न्यायालयीन बंदी / कच्चे कैदी यांचा संवाद साधून द्यावा.

३. ज्या कारागृहामध्ये व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा उपलब्ध नसेल अशा ठिकाणी तातडीने सदरची सुविधा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही संबधित कारागृह अधिक्षक यांनी विहित मार्गाने करावी.

४. खटल्याशी संबधित पोलीस अधिकारी, वैद्यकिय अधिकारी दुर्गम भागात कर्तव्यावर असल्यामुळे अथवा पोलीस अधिकारी कायदा व सुव्यवस्थेमध्ये व्यस्त असल्यामुळे जे पोलीस अधिकारी, वैद्यकिय

अधिकारी न्यायालयात साक्ष देण्यासाठी हजर राहू शकत नसल्यास त्यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे न्यायालयाशी संवाद साधून साक्ष नोंदवावी.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१५१२५०२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:22:00 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. अपर पोलीस महासंचालक,कारागृह, महाराष्ट्र राज्य
१०. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
११. सर्व पोलीस आयुक्त
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१३. सर्व अपर पोलीस महासंचालक
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१६. सर्व पोलीस अधीक्षक
१७. सर्व जिल्हा कारागृह अधीक्षक
१८. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
२०. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२१. उप सचिव (तुरूंग)
२२. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.८)
फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.
साक्षीदारांकरिता सोईसुविधा पुरविणे बाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२ मे, २०१५

**प्रस्तावना :-**

न्यायालयात साक्षीकरिता हजर राहणा-या साक्षीदारांना आहारभत्ता व प्रवास भत्ता संबधित न्यायालयामार्फत देण्यात येतो. तथापि, सध्या देण्यात येत असलेला सदरचा भत्ता कमी असल्याकारणाने ब-याचवेळा साक्षीदार खटल्याच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास टाळाटाळ करतात. तसेच, साक्षीदार न्यायालयामध्ये साक्षीसाठी उपस्थित झाल्यानंतर शासकिय अभियोक्त्यासोबत पुर्व चर्चा होणे आवश्यक आहे जेणेकरुन, खटल्याच्या सुनावणीमध्ये प्रभावीपणे बाजू मांडून दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढविणे शक्य होईल. तथापि अशी पुर्व चर्चा करण्याकरिता कोणत्याही सोईसुविधा न्यायालयाच्या आवारात उपलब्ध नाहीत. तसेच पंच फितूर होण्याचेही प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व बाबींचा विपरित परिणाम खटल्याच्या सुनावणीवर होऊन दोषारोपसिध्दीचे प्रमाण घटत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब साक्षीदारास देण्यात आहार भत्ता व प्रवास भत्यामध्ये वाढ करण्याबरोबरच शासकीय अभियोक्त्यासोबत पुर्व चर्चा करण्यासाठी सोईसुविधा पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विविध फौजदारी गुन्हयात दाखल खटल्यातील सुनावणीदरम्यान साक्षीदाराची महत्वाची भुमिका विचारात घेऊन साक्षीदारास देण्यात येणारा आहार भत्ता व प्रवास भत्यामध्ये वाढ करण्याबरोबरच शासकिय अभियोक्त्यासोबत पुर्व चर्चा करण्यासाठी सोईसुविधा पुरविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. न्यायालयात साक्षीकरिता हजर राहणा-या साक्षीदारांना Maharashtra Payment by Government of Expenses of Complainants and Witness (Attending Criminal Courts) Rules,१९८० अन्वये वर्ग १ साक्षीदार व वर्ग २ साक्षीदार यांना सध्याच्या प्रतिदिन रु.१००/- ऐवजी प्रतिदिन रु.२००/- एवढा आहारभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

३. न्यायालयात साक्षीकरिता हजर राहणा-या साक्षीदारांना Maharashtra Payment by Government of Expenses of Complainants and Witness (Attending Criminal Courts) Rules,१९८० अन्वये वर्ग ३ साक्षीदार व वर्ग ४ साक्षीदार यांना सध्याच्या प्रतिदिन रु.६०/- ऐवजी प्रतिदिन रु.१२०/- एवढा आहारभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४. खटल्याच्या सुनावणीकरिता येणा-या साक्षीदार यांचेसोबत शासकिय अभियोक्त्यास पुर्वचर्चा करण्यासाठी प्रत्येक न्यायालयाच्या आवारामध्ये २५० चौ.फु. पर्यंतची खोली बैठक व्यवस्था, पाणी व प्रसाधनगृह इत्यादी मुलभुत सोयीसुविधांसह बांधण्यात यावी.

५. प्रबंधकांनी न्यायालयाच्या आवारातील सोईस्कर जागा सुनिश्चित करुन रक्कम रुपये ३.७५ लक्ष इतक्या खर्चाच्या मर्यादेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे.

६. सदर अंदाजपत्रकास विधि व न्याय विभागाकडून प्रशासकिय मंजुरी प्राप्त करुन देण्याबरोबरच आर्थिक तरतूद करुन घेण्याची कार्यवाही संबधित न्यायालयाच्या प्रबंधकांनी करावी.

७. Maharashtra Payment by Government of Expenses of Complainants and Witness (Attending Criminal Courts) Rules,१९८० मध्ये आवश्यक त्या सुधारणा विधि व न्याय विभागाने तातडीने कराव्यात.

८. सदर शासन निर्णय विधि व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र २१०६ दि.२९/०४/२०१५ नुसार प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१५२३३३२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:27:25 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
५. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
८. प्रधान सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई.
९. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई

१०. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
११. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१२. सर्व पोलीस आयुक्त
१३. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१४. सर्व अपर पोलीस महासंचालक
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१७. सर्व पोलीस अधीक्षक
१८. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
२०. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२१. उप सचिव (पोल-१०)
२२. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.९)

फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.

प्रत्येक न्यायालयात पैरवी अधिकारी नियुक्त करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १२ मे, २०१५

**प्रस्तावना :-**

पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येते व त्या अनुषंगाने दोषारोपसिध्दीकरिता खटला सुरु राहतो. खटल्याच्या प्रत्येक सुनावणीकरिता संबधित साक्षीदार, पंच व पोलीस अधिकारी यांना न्यायालयामध्ये उपस्थित रहावे लागते. सुनावणीपुर्वी शासकिय अभियोक्त्यासोबत संबधित पोलीस अधिकारी, साक्षीदार व पंच यांची पुर्व चर्चा झाल्यास खटल्यामध्ये प्रभावीपणे बाजू मांडून दोषारोपसिध्दी होणे शक्य आहे. तथापि सदरची पुर्व चर्चा घडून येत नसल्याने दोषारोपसिध्दीचे प्रमाण घटत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब प्रत्येक खटल्याच्या सुनावणीपूर्वी अशी पुर्व चर्चा घडवून आणण्याकरिता समन्वय अधिका-याची आवश्यकता विचारात घेऊन प्रत्येक न्यायालयात एका पैरवी अधिका-याची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

फौजदारी खटल्यातील दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक न्यायालयात एक पैरवी अधिकारी नियुक्ती करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा पैरवी अधिकारी पोलीस हवालदार किंवा सहाय्यक पोलीस उप निरीक्षक या दर्जाचा राहिल.

३. सदचा पैरवी अधिकारी न्यायालयात सुरु असलेल्या खटल्याचा दैनंदिन आढावा घेऊन खटलानिहाय शासकिय अभियोक्त्यासोबत संबधित पोलीस अधिकारी, साक्षीदार व पंच यांची पुर्व चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी पार पाडेल.

४. प्रत्येक न्यायालयाकरीता एक पैरवी अधिकारी याप्रमाणे १२९१ इतक्या पैरवी अधिकारी पदांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव संचालक, अभियोग संचालनालय यांनी तयार करुन मान्यतेस्तव गृह विभागास सादर करावा.

५. न्यायालयनिहाय खटल्यांचे प्रमाण विचारात घेऊन संबधित न्यायालयात पोलीस हवालदार अथवा सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांची आवश्यकता आहे हे प्रथम निश्चित करावे. तदनंतर सदर १२९१ पदांपैकी पोलीस हवालदार व सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांची संख्या संचालक, अभियोग संचालनालय यांनी निश्चित करावी.

६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या मुळ आस्थापनेवरील पोलीस हवालदार किंवा सहाय्यक पोलीस उप निरीक्षक हे संचालक, अभियोग संचालनालय यांच्या आस्थापनेवरील पैरवी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने राहतील.

७. संचालक, अभियोग संचालनालय यांनी निश्चित केलेल्या संख्येनुसार व मागणीनुसार पोलीस हवालदार व सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांच्या सेवा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन द्याव्यात.

८. सदरची पोलीस हवालदार अथवा सहाय्यक पोलीस उप निरीक्षक यांची पदे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या मुळ आस्थापनेवरील असल्याने, प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन द्यावयाच्या १२९१ पदांची भरती आराखडयात समावेश करण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी करावी.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१५५३०५२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:40:30 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
१९. उप सचिव (पोल-१०)
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.१०)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**दोषारोप गुणवत्ता तपासणी करता मध्यवर्ती संनियंत्रण समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद झाल्यानंतर गुन्हयाच्या तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले जाते. तथापि, अशा दोषारोपपत्रामधील पुरावे कायदयाच्या कसोटीवर न उतरल्याने अशा गुन्हयांची दोषारोपसिध्दी होत नाही. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, आरोपीचा बचाव करण्याचा आरोप किंवा टीका होऊ नये याकारणाकरिता सबळ पुरावा नसतानाही तपासी अधिकारी ब-याच प्रकरणांमध्ये दोषारोपत्र दाखल करतात तसेच, काही प्रकरणांमध्ये तपास पूर्ण झालेला नसतानाही तपासी अधिकारी अर्धवट दोषारोपपत्र दाखल करतात. यासर्व बाबींमुळे दोषारोपसिध्दीचे प्रमाण घटत आहे. सबब दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढवून गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टीकोणातून दोषारोप गुणवत्ता तपासणी करता मध्यवर्ती सनियंत्रण समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

गुन्हयाचा तपास पुर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यापूर्वी एका मध्यवर्ती संनियंत्रण समितीमार्फत (Monitoring Committee) सदर दोषारोपपत्राची गुणवत्ता तपासून घेण्याचा निर्णय सदर शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे.

२. सदर मध्यवर्ती सनियंत्रण समितीची (Monitoring Committee) संरचना खालीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | न्याय दंडाधिकारी न्यायालयाकरिता | अ.क्र. | सत्र न्यायालयाकरिता |
|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपायुक्त यांचा प्रतिनिधी | १ | पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपायुक्त यांचा प्रतिनिधी |
| २ | सहाय्यक संचालक | २ | जिल्हा सरकारी अभियोक्ता |
| ३ | तपासी अधिकारी | ३ | तपासी अधिकारी |

३. सर्व पोलीस अधीक्षक व पोलीस उप-आयुक्त यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यामध्ये दाखल गुन्ह्यांचा आढावा घेऊन ज्या गुन्ह्यामध्ये अद्याप दोषारोपपत्र दाखल केले गेले नाहीत अशा गुन्ह्यांची स्वतंत्र यादी करावी व उपलब्ध पुराव्याच्या आधारे कायद्याच्या कसोटीवर टिकू शकणा-या गुन्ह्यांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यापूर्वी सदर दोषारोपांची गुणवत्ता उपरोक्त समितीमार्फत तपासून घ्यावी.

४. ज्या दोषारोपामध्ये समितीला योग्य तो कायदेशीर पुरावा दिसला नाही अशा दोषारोपांची स्वतंत्र यादी करून योग्य ती कारणमीमांसा नमूद करून त्या दोषारोपाबाबत पुढील तपास करणे किंवा अहवाल दाखल करण्याबाबत शिफारस पोलीस अधीक्षक व पोलीस उप-आयुक्त करतील.

५. दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरिता उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करून प्रभावी अंमलबजावणीकरिता सर्व पोलीस घटक जबाबदार राहतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१५४३६३२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:32:00 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
१९. उप सचिव (पोल-१०)
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.११)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**<u>राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा सक्षमीकरणासाठी समिती गठीत करण्याबाबत</u>**

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : १२ मे, २०१५**

**<u>प्रस्तावना :-</u>**

न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या खटल्यात गुन्हा शाबित करण्याकरिता सबळ व कायद्याच्या कसोटीवर टिकणा-या पुराव्यांची आवश्यकता असते. तपासामध्ये तपासीअधिकारी यांनी सादर केलेले पुराव्याला शास्त्रोक्त जोड न मिळाल्याने असे पुरावे कुचकामी ठरतात. राज्यातील न्याय सहाय्यक वैज्ञानिक शाळांमार्फत तपासणी करुन घेतलेले गुन्हयातील पुरावे कधी कधी तांत्रिक कारणास्तव निरुपयोगी ठरतात. या सर्व बाबींचा प्रतिगामी परिणाम होऊन दोषारोपसिध्दीचे प्रमाणे घटत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. सबब दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा अत्याधुनिक व अधिक सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा अत्याधुनिक व अधिक सक्षम करण्यासाठी प्रधान सचिव/सचिव (विशेष), गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर समितीची संरचना पुढीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव/ सचिव (विशेष), गृह विभाग | -अध्यक्ष |
| २. | पोलीस महानिरीक्षक (गुन्हे अन्वेषण विभाग, गुन्हे) | - सदस्य |
| ३. | संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई | - सदस्य |
| ४. | पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मुंबई | - सदस्य |
| ५. | संचालक, आय.आय.टी. यांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| ६. | सह सचिव/उप सचिव (पोल-४) | - सदस्य सचिव |

३. सदर समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहील:-

**अ.** राज्यातील सध्याच्या न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा मधील उपलब्ध यंत्रसामग्री व मनुष्यबळाचा आढावा घेऊन त्रुटींच्या पुर्ततेबाबत शासनास शिफारस करणे.

**ब.** कायदयाच्या कसोटीवर टिकू शकणारे पुराव्यास शास्त्रोक्त जोड देण्याच्या अनुषंगाने आधुनिक उपकरणे व तंत्रज्ञान अवलंबण्याबाबत शासनास शिफारस करणे.

**क.** न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांची आवश्यक संख्या व मनुष्यबळ निश्चित करुन शासनास शिफारस करणे.

**ड.** राज्यातील न्यायसहाय्यक प्रयोगशाळा सक्षम व आधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाय योजनांचा प्रशासकिय व आर्थिक आराखडा शासनास सादर करणे.

**४.** उपरोक्त समिती सदर आदेशाच्या दिनांकापासून तीन महिन्यांत शासनास शिफारस करेल.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१६१३८९२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:48:07 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा
१८. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१९. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२०. सह सचिव/उप सचिव (पोल-४)
२१. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.१२)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयांमध्ये सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

एखादा गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळाचा व वेळोवेळी पुरावा गोळा करताना तपासी अधिकारी पंचनामा करीत असतात. अशा पंचनाम्याच्यावेळी उपस्थित असलेल्या पंचाचे जबाब खटल्याच्या सुनावणी दरम्यान महत्वपुर्ण ठरत असतात. गुन्हा घडल्यानंतर खटला सुनावणीस येण्याकरिता काही प्रकरणांमध्ये बराच कालावधी उलटून गेलेला असतो. तपासी अधिका-याने तत्कालीन परिस्थितीत उपस्थितीत केलेले पंच सुनावणी दरम्यान प्रामाणिक राहतील याची खात्री नसते. पंच फितूर झाल्यामुळे ब-याचश्या गंभीर गुन्हयांमध्ये आरोपी निर्दोष सुटतात. त्यामुळे दोषारोपसिध्दीचे प्रमाणे घटत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. गुन्हयाच्या तपासादरम्यान पंच म्हणुन सरकारी कर्मचा-यांची सेवा घेतल्यास सुनावणी दरम्यान पंच फितुर होण्याची शक्यता फार कमी राहिल अशा निष्कर्षाप्रत शासन आले आहे. सबब, गुन्हयाच्या तपासादरम्यान सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पंच फितुर होऊन दोषारोपसिध्दीचे प्रमाण कमी होणा-या प्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीने सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयांमध्ये सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेण्याचा निर्णय सदर शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे.

२. ज्या गुन्हयामध्ये सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा नमूद केली असेल अशा प्रकरणांमध्ये तपासी अधिकारी यांनी शक्यतोवर सरकारी कर्मचा-याची पंच म्हणून सेवा घ्यावी.

३. सदरची सेवा पंच म्हणून घेताना ज्या परिसरामध्ये खटल्याची सुनावणी होणार आहे त्या परिसरात वास्तव्य असणा-या सरकारी कर्मचा-यास पंच म्हणून घ्यावे जेणेकरुन खटल्याच्या सुनावणीदरम्यान सदर पंचास उपस्थित राहणे सुलभ होईल.

४. पंच म्हणून घेत असलेल्या सरकारी कर्मचा-याचे चारित्र्याबाबत प्रथम मौखिक स्वरुपात तपास अधिका-याने खातरजमा करुन घ्यावी.

५. एकाच सरकारी कर्मचा-यास अनेक गुन्हयांत वारंवार पंच म्हणून घेण्यात येवू नये.

६. गुन्हयातील फिर्यादी व आरोपी यांचे नातेवाईक असलेल्या सरकारी कर्मचा-यास पंच म्हणून घेण्यात येवू नये.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१६२६००२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 12:55:16 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
५. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
८. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
१०. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
११. सर्व पोलीस आयुक्त
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१३. सर्व अपर पोलीस महासंचालक
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१६. सर्व पोलीस अधीक्षक
१७. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१९. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२०. सह सचिव (आस्थापना)
२१. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.१३)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**उत्कृष्ट कामाला प्रोत्साहन देण्याकरिता "मुख्यमंत्री पदक" देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

पोलीस ठाण्यामध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अशा गुन्हयाच्या सर्वकष तपासाअंती न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यात येतो. खटल्याच्या सुनावणीदरम्यान तपासी अधिकारी यांनी सादर केलेले पुरावे, पंच, साक्षिदार यांच्या भुमिका व शासकिय अभियोक्त्याने या सर्व बाजू न्यायालयासमोर मांडलेली प्रभावी बाजू यावर सदर गुन्हयाचे दोषारोपसिध्दी अवलंबून असते. दोषारोपसिध्दीमध्ये तपासी अधिका-याचे तपासाचे कौशल्य जितके महत्वाचे आहे तितकेच शासकिय अभियोक्त्याचे कायदेशिर कौशल्यही महत्वाचे आहे. बरेचसे गुन्हे हे रस्त्यावर घडत असतात त्यामुळे अशा ठिकाणी गुन्हेगारीस चाप लावणा-या पोलीस आधिका-यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.तपासी अधिकारी व शासकिय अभियोक्त्यांना चांगल्या कामगिरीबाबत प्रोत्साहित केल्यास दोषारोपसिध्दीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल. सबब, रस्त्यावरील गुन्हयांबाबत चांगली कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी, उत्कृष्ट तपासकाम करणा-या तपासी अधिकारी, तसेच दोषारोपसिध्दीचे चांगले प्रमाण असलेल्या शासकिय अभियोक्त्यास "मुख्यमंत्री पदक" देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रस्त्यावरील गुन्हयांबाबत चांगली कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी, उत्कृष्ट तपासकाम करणा-या एका सर्वश्रेष्ठ कनिष्ठ तपासी अधिकारी व एका सर्वश्रेष्ठ वरिष्ठ तपासी अधिकारी, तसेच "गर्भधारण पूर्व और प्रसव पूर्व निदान तकनीक अधिनियम, १९९४" कायदयाखालील गुन्हयामध्ये दोषारोपसिध्दीचे जास्त प्रमाण असलेल्या एका सहाय्यक सरकारी अभियोक्त्यास "मुख्यमंत्री पदक" देण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. "मुख्यमंत्री पदक" पुरस्काराकरिता प्रस्तावाचा नमुना, पात्रतेचे निकष व प्रशस्ती पत्रकाचे स्वरुप याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सुचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाच्या मान्यतेने अंतिम कराव्यात.

४. प्रत्येक वर्षामध्ये रस्त्यावरील गुन्हयांबाबत चांगली कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी यांना शासनाच्या वतीने "मुख्यमंत्री पदक" पुरस्कार देण्याकरिता प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरिता खालीलप्रमाणे समितीची स्थापना करण्यात येत आहे. सदर समिती आपली कार्यपद्धती स्वत: ठरवेल.

| | |
|---|---|
| पोलीस महासंचालक | -अध्यक्ष |
| पोलीस महासंचालक (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) | - सदस्य |
| पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | - सदस्य |
| अपर पोलीस महासंचालक (कायदाव सुव्यवस्था) | - सदस्य |
| अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) | -सदस्य सचिव |

५. प्रत्येक वर्षामध्ये उत्कृष्ट तपास काम करणा-या एका सर्वश्रेष्ठ कनिष्ठ तपासी अधिकारी व एका सर्वश्रेष्ठ वरिष्ठ तपासी अधिकारी व "गर्भधारण पूर्व और प्रसव पूर्व निदान तकनीक अधिनियम, १९९४" कायदयाखालील गुन्हयामध्ये दोषारोपसिध्दीचे जास्त प्रमाण असलेल्या सहाय्यक सरकारी अभियोक्त्या यांना शासनाच्या वतीने "मुख्यमंत्री पदक" पुरस्कार देण्याकरिता प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरिता खालीलप्रमाणे समितीची स्थापना करण्यात येत आहे, सदर समिती आपली कार्यपद्धती स्वत: ठरवेल.

| | |
|---|---|
| पोलीस महासंचालक | -अध्यक्ष |
| अपर पोलीस महासंचालक (गुन्हे) | - सदस्य |
| प्रधानसचिव/ सचिव (विशेष),गृह विभाग | - सदस्य |
| संचालक, अभियोग संचालनालय | - सदस्य |

६. पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये उत्कृष्ट तपास काम करणा-या एका सर्वश्रेष्ठ कनिष्ठ तपासी अधिकारी व एका सर्वश्रेष्ठ वरिष्ठ तपासी अधिकारी यांची शिफारस "मुख्यमंत्री पदक" पुरस्काराकरिता पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडे पाठवावी.

७. संचालक अभियोग संचालयाने यांनी "गर्भधारण पूर्व और प्रसव पूर्व निदान तकनीक अधिनियम, १९९४" कायदयाखालील गुन्हयामध्ये दोषारोपसिध्दीचे जास्त प्रमाण असलेल्या सहाय्यक सरकारी अभियोक्त्या यांची शिफारस "मुख्यमंत्री पदक" पुरस्काराकरिता पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडे पाठवावी.

८. एक वर्षात उत्कृष्ट काम केलेल्या संबधित अधिका-यांची शिफारस "मुख्यमंत्री पदक" पुरस्काराकरिता दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत करावी.

९. सदर समिती प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन पात्र अधिका-यांची "मुख्यमंत्री पदक" पुरस्कारासाठी शासनाकडे शिफारस करेल.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१६३६६०२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 13:04:19 +05'30'

**(द.सं.पाटील)**

**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई

५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

६. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
७. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
९. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
१०. सर्व पोलीस आयुक्त
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१२. सर्व अपर पोलीस महासंचालक
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१५. सर्व पोलीस अधीक्षक
१६. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१८. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
१९. सह सचिव (पोल-१)
२०. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवडनस्ती

(१४ पैकी शासन निर्णय क्र.१४)

**फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.**

**पोलीस अधिका-यांच्या गोपनीय अहवालामध्ये दोषारोपसिध्दीची माहिती नमुद करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, दुसरा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १२ मे, २०१५**

**प्रस्तावना :-**

पोलीस ठाण्यामध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अशा गुन्हयाच्या सर्वकष तपासाअंती न्यायालयामध्ये खटला दाखल करण्यात येतो. खटल्याच्या सुनावणीदरम्यान तपासी अधिकारी यांनी केलेल्या कौशल्यपूर्ण तपासावर सदर गुन्हयाचे दोषारोपसिध्दी अवलंबून असते. तपास अधिका-याने हाताळलेले तपास व त्यामध्ये झालेली दोषारोपसिध्दी याचा एकत्रित राज्यस्तरीय अभिलेख नसल्यामुळे दोषारोपसिध्दीबाबत विश्लेषण करणे शक्य होत नाही. सबब, राज्यातील सर्व गुन्हयांबाबत झालेल्या न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने स्वतंत्र अभिलेख ठेवणे व त्या अनुषंगाने तपास अधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे गोपनिय अहवाल लिहिताना सदरच्या बाबी विचारात घेण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सर्व गुन्हयांबाबत झालेल्या न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने स्वतंत्र अभिलेख ठेवणे व त्या अनुषंगाने तपास अधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे गोपनीय अहवाल लिहिताना सदरच्या बाबी विचारात घेण्याचा निर्णय सदर शासन निर्णयान्वये घेण्यात येत आहे.

२. दिनांक १ जानेवारी २०१५ पासून प्रत्येक गुन्हा प्रकरणात न्यायालयाचे झालेले निर्णय व त्यामधील तपास अधिकारी याचा अभिलेख अपर पोलीस महासंचालक, (गुन्हे), महाराष्ट्र राज्य हे ठेवतील.

३. गोपनीय अहवाल लिहतेवेळी वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या मागणीनुसार सदरचे अभिलेख उपलब्ध करून देण्यात येईल.

४. पोलीस अधिकारी यांच्यासाठी वेगळा गोपनीय अहवालाचा मसुदा तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

(अ) प्रधान सचिव / सचिव (विशेष),गृह विभाग.
(ब) पोलीस महानिरीक्षक (गुन्हा अन्वेषण विभाग),
(क) सह सचिव/उप सचिव, गृह विभाग
(ड) सह सचिव/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग

५. भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी व राज्य पोलीस सेवेतील पोलीस अधिका-यांचे गोपनीय अहवालामध्ये त्यांच्या तपास/पर्यवेक्षण क्षमतेचा समावेश करावा.

६. राज्य पोलीस सेवेतील अधिकारी यांनी गोपनीय अहवाल लिहिताना दोषसिध्दीबाबत बजावलेल्या कामगिरीचा आढावा घ्यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५०५१२१७१७००९१२९ हा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: CN = Dattatray Santaram Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.05.13 13:11:22 +05'30'

**(द.सं.पाटील)**
**उप सचिव, गृह विभाग,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
५. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मुंबई
६. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा),गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
८. प्रधान सचिव व विधी परामर्श, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई
१०. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई
११. सर्व पोलीस आयुक्त
१२. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१३. सर्व अपर पोलीस महासंचालक
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१६. सर्व पोलीस अधीक्षक
१७. संचालक, अभियोग, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. मा.राज्यमंत्री (शहरे) यांचे खाजगी सचिव
१९. मा.राज्यमंत्री (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
२०. सह सचिव/उप सचिव (पोल-१, पोल-१-अ, पोल-२, पोल-५-अ, पोल-५-ब)
२१. सर्व सह सचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व कार्यासने, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. निवडनस्ती